नि.१८

# कुडाळ येथील मे. दिवाणी न्यायधिश(क.स्तर) साहेब यांचे कोर्टात

नियमित दावा क्र. ५३/२०२५

श्री.गणपत लक्ष्मण उर्फ आबा देसाई ------------- वादी

विरुद्ध

श्री.सविता सदानंद देसाई ----------- प्रतिवादी

**वादी तर्फे ऑर्डर २६. रूल ९ प्रमाणे विनंती अर्ज असा की,**

सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी विरुद्ध दावा मिळकतीत बेकायदा नवीन घराचे बांधकाम करत असलेबाबत कायमचे ताकिदी करिता दाखल केला आहे.

१) दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित कुळपणाची मिळकत असून तसेच त्यांना सदर मिळकत कुळ कायदा अन्वये प्राप्त झालेली आहे.परंतु अदयापर्यंत त्यांना कुळ कायदयाने विक्री झालेली नाही, तर या मिळकतीचे ते कुळ आहेत. वादी यांचे वडिलांचे मृत्यू पश्चात वादी व प्रतिवादी सह हिस्सेदार यांचे नावाची नोंद फेरफार क्र.३८३४ ने नोंद महसूल दसरी झाली. परंतु एकत्र कुटुंब कर्ता व वादीचे नावाची सातबारा सदरी नावाची नोंद नमूद आहे.

२) वादीचे म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी याने नवीन घराचे बेकायदा बांधकाम करीत आहे. सदर मिळकतीचे अद्याप हद्दीमेरे निशी वाटप झालेले नाही. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये

O
Issue notice to opp. to call Say.
21/08/25

गणपत लक्ष्मण देसाई

अतिक्रमण करून कोणत्याही प्रकारचे बांधकाम केलेले नाही.तर प्रतिवादी हा अन्य मिळकतीत बांधकाम केले आहे असे शपथेवर कथन करून आपली कैफियत व म्हणणे दाखल केले आहे.प्रत्येक्षात वादीच्या म्हणणे प्रमाणे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये बांधकाम केले आहे की, दावा मिळकतीच्या बाहेर आहे. यातील संदीग्धता दुर होऊन खरी वस्तुस्थिती मे. कार्टासमोर येणे करीता तसेच दाव्याचा निर्णय योग्य रितीने होण्याच्या दृष्टीने दावा मिळकत तसेच सर्व्हे.नं.११९, हिस्सा नं. ३ ही प्रतिवादीची मिळकत हदीसहीत मोजणी होणे आवश्यक आहे.

३) **करीता वादी तर्फे मे. कोर्टास विनंती अशी की,**

दावा मिळकत तसेच सर्व्हे.नं.११९, हिस्सा नं. ३ ची मिळकतीची मोजणी करून प्रतिवादीने केलेल्या बांधकाम मोजमापा सहित मे. कोर्टासमोर येणेकरीता तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कुडाळ यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात यावी.

सदर कामी आवश्यक असणारी कमिशन फी भरण्यास वादी तयार आहे. दाव्याचा निर्णय योग्य रितीने होणेकरीता तसेच कायदयाच्या व न्यायपूर्ततेच्या कारणाकरीता सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा. तसेच प्रतिवादीने बांधकाम केल्याने त्या अनुषंगाने दाव्यात आवश्यक ती दुरूस्ती करण्यास पुढील मुदत मिळावी अशी वादीतर्फे मे. कोर्टास विनंती आहे.

गणपत ल. देसाई

**दिनांक** २७/०८/२०२५

**कुडाळ** **(श्री.गणपत लक्ष्मण उर्फ आबा देसाई)**

## <u>अर्जाचे तर्फे दाव्याच्या पृष्टयर्थ ॲफिडेव्हीट</u>

मी **श्री.गणपत लक्ष्मण देसाई** वय-७६ वर्षे,धंदा-शेती, रा.डिगस गावठणवाडी, ता.कुडाळ,जि.सिंधुदुर्ग, आज मुक्काम कुडाळ येथे सत्यप्रतिज्ञेवर सांगतो की, वर नमूद दाव्यातील सर्व मजकूर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे पूर्ण खरा व बरोबर आहे. म्हणून केले सत्यप्रतिज्ञेवर अर्जाचे पृष्टयर्थ ॲफिडेव्हीट.

**दिनांक** -२१/०८/२०२५

**कुडाळ** **(श्री.गणपत लक्ष्मण उर्फ आबा देसाई)**

सदरहू व्यक्तिस मी ओळखतो.

(Adv. ...)

वादी तर्फे वकील